Rediffusion/Edelman

Coverage Report: TCS IT Wiz – Nagpur Edition

# सेंटर पॉईंट स्कूल ठरले 'टीसीएस आयटी विझ २०१६' चे विजेते

**लोकशाही वार्ता/नागपूर**

देशातील अग्रणी कन्सल्टन्सी व बिजनेस सोल्युशन्स कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)तर्फे आयोजित भारतातील सर्वात मोठी आंतर-शालेय प्रश्नमंजुषा स्पर्धा वसंतराव देशपांडे सभागृह, सिव्हिल लाईन्स येथे नुकतीच पार पडली.

स्पर्धेत विविध शाळांच्या ८०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. त्यामध्ये सेंटर पाईंट स्कूलच्या विद्यार्थ्यांनी अंतिम फेरीत विजेतेपद पटकाविले. इयत्ता ८ वी ते १२ वीच्या विद्यार्थ्यांसाठी ही निःशुल्क स्पर्धा आयोजित करण्यात आली असून, देशभरातील विविध शहरात आयोजित करण्यात येणारी टीसीएस आयटी विझ नागपुरात २०१२ पासून आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी स्पर्धेची संकल्पना डिफॉल्ट इज डिजिटल ही होती.



प्रादेशिक अंतिम फेरीतील प्रश्नमंजुषेच्या पाच फेऱ्यानंतर सेंटर पॉईंट स्कुल (काटोल रोड) शाळेच्या मोहम्मद तहाउद्दीन व देवेश राजपूत या विद्यार्थ्यांना विजेतेपद मिळाले. विजेत्यांना प्रत्येकी एक आयपॅड देऊन, तर उपविजेते ठरलेल्या शिवाजी सायन्स ज्युनिअर कॉलेजच्या कुणाल वासनिक व ऋत्विक गुप्ते यांना मिनी आयपॅड तसेच स्मृतीचिन्ह व पदक देऊन गौरविण्यात आले. यासोबतच अंतिम फेरीतील सर्व ६ स्पर्धक चमूंना टीसीएसतर्फे स्पेस पॅक, सेल्फी स्टिक, इअरफोन्स, ब्लूटूथ स्पिकर्स व पेन ड्राइव्ह असे आकर्षक बक्षीस देण्यात आले. राष्ट्रीय अंतिम फेरीत भाग घेण्यासाठी विजेत्या टीमला एक शिक्षक/पालकासोबत विमानाद्वारे मुंबईला नेण्यात येईल. यावेळी टीसीएस इंटर्नल आयटी अँड शेअर सर्व्हिसेस चे उपाध्यक्ष व जागतिक प्रमुख आलोक कुमार यांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले. संचालन गिरी पिकब्रेन सुब्रमण्यम यांनी केले.